महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६
उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१कक) खालील सूचना
बृहन्मुंबईच्या एस प्रभागाच्या मंजूर सुधारीत विकास
योजनेमधील न.भु.क्र. ३५६अे/२ मौजे हरियाली या
भूखंडावरील "वर्कींग विमेन्स होस्टेल" या आरक्षणाचे
प्रस्तावित फेरबदलाबाबत

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**क्रमांक** :- टिपीबी ४३१६/ प्र.क्र.६७/ २०१६ /नवि-११
मंत्रालय, मुंबई :४०० ०३२.
दिनांक :- २७ मे, २०१६.

**शासन निर्णय** : सोबत जोडलेली सूचना शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( श्रीरंग दि. लांडगे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.**
**मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव.**

**प्रति,**

(१) प्रधान सचिव, (विधी व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई.
(२) महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
(३) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
(४) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, इन्सा हटमेंट, महापालिका मार्ग, मुंबई- ४०० ००१.
(५) प्रमुख अभियंता (वि.नि.), बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
(६) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय सूचना महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या २५ प्रती नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ व उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)
(७) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९,( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.)
(८) निवड नस्ती (नवि-११)

The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

---

- Notice under Section 37(1AA) of the said Act.
- Proposed Modification to the Sanctioned Revised Development Plan of 'S' ward of Greater Mumbai, 1991 in respect of land bearing CTS No. 356A/2, Village Hariyali reserved for "Working Women's Hostel"

Government of Maharashtra,
Urban Development Department,
Mantralaya, Mumbai-400 032.
Dated : 27th May, 2016.

**NOTICE**

No. TPB 4316/CR-67/2016/UD-11

Whereas the Revised Development Plan of "S" ward of Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Development Plan") has been sanctioned by the Government in the Urban Development Department, under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No.TPB –4392/6039/ UD-11 dated 1st April, 1993 so as to come into force with effect from the dt. 11th May 1993;

And whereas, as per said Development Plan, land bearing CTS No. 356A/2, Village Hariyali, Kannamwar Nagar, Vikhroli(E), Tauka- Kurla, Mumabi is reserved for "Working Women's Hostel" (hereinafter referred to as "the said land");

And whereas, for the purpose of construction of Court Building, Govt. in Law and Judiciary Department has purchased the said land from Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) in the year 1986 and possession of the said plot was already handed over to Public Works Department in year 2004;

And whereas, Law and Judiciary Department has requested for change in the reservation in respect of the said land and to reserve it for "Court Building";

And whereas, the Govt. is satisfied that in the public interest it is expedient to change the reservation on the said land of "Working Women's Hostel" to that of "Court Building" (hereinafter referred to as "the proposed modifications" and more specifically described in the schedule appended hereto );

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of the powers vested in it under sub-section (1AA) of Section 37 of the said Act, and all other powers enabling it in this behalf, the Government hereby publishes a Notice for inviting suggestions and objections from any person with respect to proposed modification, as required by clause (a) of sub-section (1AA) of Section 37 of the said Act,

within period of one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette.

The Government is further pleased to inform that any objections/ suggestions upon the proposed modification received before the expiry of one month from the date of publication of this notice in the Maharashtra Government Official Gazette be forwarded to the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai-400001. Any objection or suggestion, which may be received by the Deputy Director of Town planning, Greater Mumbai within the said period shall be dealt with in accordance with the provisions of the said sub-section (1AA) of section 37.

A plan showing the proposed modification shall be kept open for the inspection at the following places:-

(1) Office of the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400001.
(2) Office of the Chief Engineer (Development Plan) Municipal Corporation of Greater Mumbai, Mahapalika Marg, Mumbai 400001.

## SCHEDULE

"The reservation of "Working Women's Hostel" is proposed to be changed as "Court Building" on the said Land admeasuring about 2098.75 Sq. mtrs bearing CTS No. 356A/2, Village Hariyali, Kannamwar Nagar, Vikhroli(E),Tauka- Kurla, as shown on the plan. Law and Judiciary Department will be the appropriate authority for reservation of "Court Building"."

This Notice shall also be available on the Govt. of Maharashtra website : www.maharashtra.gov.in

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(Kishor D. Girolla)
Under Secretary to Government.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६
उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१कक) खालील सूचना
बृहन्मुंबईच्या एस प्रभागाच्या मंजूर सुधारीत विकास
योजनेमधील न.भु.क्र. ३५६अे/२ मौजे हरियाली या
भूखंडावरील "वर्कींग विमेन्स होस्टेल" या आरक्षणाचे
प्रस्तावित फेरबदलाबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २७ मे, २०१६

क्रमांक - टिपीबी-४३१६/प्र.क्र.६७/२०१६/नवि-११

## सुचना

ज्याअर्थी, बृहन्मुंबई क्षेत्राच्या एस प्रभागाची सुधारित विकास योजना (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे). शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टीपीबी/ ४३९२/६०३९/नवि-११, दिनांक १ एप्रिल १९९३ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) च्या कलम ३१(१) खालील तरतुदीनुसार मंजूर झाली असून दिनांक ११ मे १९९३ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी न.भु.क्र.३५६अे/२ मौजे हरियाली, कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व) तालुका - कुर्ला मुंबई ही जमीन (यापुढे "उक्त जमीन" असा उल्लेख करण्यात आला आहे) उक्त विकास योजनेमध्ये "वर्कींग विमेन्स होस्टेल" करीता आरक्षित आहे;

आणि ज्याअर्थी शासन, विधी व न्याय विभागाने उक्त जमीन कोर्ट इमारतीच्या बांधकामाकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून (म्हाडा) सन १९८६ मध्ये खरेदी केली असून सदर भूखंडाचा यापूर्वीच सार्वजनिक बांधकाम विभागास सन २००४ मध्ये ताबा देण्यात आला आहे;

आणि ज्याअर्थी, विधी व न्याय विभागाने सदर जमिनीवरील आरक्षणामध्ये बदल करुन "कोर्ट इमारत" याकरीता सदर जमिन आरक्षित ठेवण्याची विनंती केली आहे;

आणि ज्याअर्थी, सार्वजनिक हित विचारात घेता शासनाचे असे मत झाले आहे की, उक्त जमिनीवरील "वर्कींग विमेन्स होस्टेल" या आरक्षणाऐवजी "कोर्ट इमारत" म्हणून आरक्षित करणेसाठी तातडीने उक्त विकास योजनेमध्ये फेरबदल करणे आवश्यक झालेले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" आणि विशेषत्वाने यामधील परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे करण्यात आला आहे);

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील इतर सर्व शक्तींचा वापर करुन, शासन याव्दारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७,

पोट कलम (१कक) चे खंड (क) नुसार सदर प्रस्तावित फेरबदलामुळे बाधित होणाऱ्या सर्व व्यक्तीकडून सदरची सूचना शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून एक महिन्याचे मुदतीमध्ये हरकती / सूचना मागविण्यासाठी सूचना प्रसिध्द करीत आहे;

शासनाकडून असेही कळविणेत येत आहे की, प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणतीही हरकत/सूचना शासन राजपत्रात सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत उपसंचालक,नगर रचना, बृहन्मुंबई यांचेकडे इन्सा हटमेंटस, ई ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१ या कार्यालयाचे पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. उपसंचालक,नगर रचना, बृहन्मुंबई यांच्याकडे सदरच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या हरकती/सूचना यावर कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत सूचना व प्रस्तावित फेरबदलाचा नकाशा जनतेच्या अवलोकनार्थ कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये खालील ठिकाणी उपलब्ध राहील.

१) उपसंचालक,नगर रचना, बृहन्मुंबई यांचे कार्यालय इन्सा हटमेंटस, ई ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.
२) प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय,महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

## परिशिष्ट

मौजे हरियाली, कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व) तालुका-कुर्ला येथील न.भू.क्र. ३५६अे/२ क्षेत्र सुमारे २०९८.७५ चौ.मी. जमीनीवरील "वर्कींग विमेन्स होस्टेल" हे आरक्षण बदलून "कोर्ट इमारत" याकरीता आरक्षण यासोबतच्या नकाशावर दर्शविलेप्रमाणे प्रस्तावित करणेत येत आहे. शासनाचे विधी व न्याय विभाग हे "कोर्ट इमारत" आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण राहतील."

सदर फेरबदलाची सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(किशोर द. गिरोल्ला)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन